## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education

नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर -440 001

e-mail :-msboardnagpur@gmail.com    www.nagpureduboard.in

**परीक्षा प्राध्यान्य / महत्वाचे**

पत्र क्र. नाविमं / उमागो / प्रात्यक्षिक / १२८
नागपूर, दि. ०८/०१/२०२५

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
भंडारा / चंद्रपूर / नागपूर / वर्धा / गडचिरोली / गोंदिया.

**विषय** :– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ. १२ वी) फेब्रु / मार्च २०२५ च्या प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य वाटपाबाबत.

**संदर्भ** :– १) राज्य मंडळाचे पत्र क्र. रा. मं./ परीक्षा–६ / ४५०५ पुणे–४११००४ दि. २१/११/२०२४
२) राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं /ऑनलाईन आय. टी./जी. के./४८०६ दिनांक :– २९/११/२०२४
३) राज्य मंडळाचे पत्र क्र. रा. मं./ परीक्षा–६ / ४८४६ पुणे–४११००४ दि. १६/१२/२०२४

उपरोक्त संदर्भिय विषयाला अनुसरून आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु / मार्च २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.१२वी ) प्रात्यक्षिक परीक्षा व इतर तत्सम परीक्षा शुक्रवार दिनांक २४/०१/२०२५ ते सोमवार दिनांक १०/०२/२०२५ या कालावधीत आयोजीत करणेबाबत कळविण्यात आले आहे.

सदर परीक्षेसाठी आवश्यक असणारे साहित्य मंडळामार्फत **दिनांक २०/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० ते ५.०० या वेळेत जिल्हा संकलन केंद्रावर वाटप करण्यात येईल. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांचे प्रस्ताव प्रवेशपत्रासह संकलन केंद्रावर बंद लिफाफ्या मध्ये सादर करावे.** त्यासाठी सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपला प्रतिनिधी अधिकार पत्रासह पाठविण्याची व्यवस्था करावी.

**संकलन केंद्र. – साहित्य वाटप व साहित्य स्विकारणे खालील दिलेल्या संकलन केंद्रावर करण्यात येईल.**

१) लाल बाहादूर शास्त्री क. महाविद्यालय, **.भंडारा.**
२) नंदलाल पाटील कापगते विद्यालय, **साकोली**
३) हिंदी सिटी हायस्कुल, **चंद्रपूर**
४) जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, **नागभीड**
५) न्यु.इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालय, **वर्धा**
६) शिवाजी विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, **गडचिरोली**
७) धर्मराव विद्यालय, **आलापल्ली**
८) हितकारणी विद्यालय, **आरमोरी**
९) गुजरात नॅशनल कनिष्ठ महाविद्यालय, **गोंदिया**
१०) नागपूर विभागीय मंडळ,कार्यालय **नागपूर**

प्रात्यक्षिक परीक्षा सुरळीतपणे पार पडतील या दृष्टीने आपण विशेष मार्गदर्शक सुचनांचे पालन करुन मंडळास योग्य ते सहकार्य करावे प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य आपला प्रतिनिधी मार्फत दिलेल्या वरील दिनांकास संकलन केंद्रावर प्राप्त करावयाचे आहेत. विलंबामुळे विद्यार्थ्यांचा निकाल राखीव राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर

प्रतिलिपी,

१) मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजी नगर, पुणे–४ यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित
२) मा. शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित
३) शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) जि. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून देणे.